**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२२**
**सन २००६-२००७.**

विषय क्रमांक :- १ दिनांक २०/३/२००७

ठराव क्रमांक :- १ दिनांक २०/३/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक १७/२/२००७, दिनांक २८/२/२००७ व दिनांक ५/३/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- दिनांक १७/२/२००७ रोजी मंजूर केलेला ठराव वाचून दाखविण्यांत यावा.

त्या प्रमाणे मा.स्थायी समिती सभा दिनांक १७/२/२००७ रोजी मा.स्थायी समिती सभेत पारीत झालेला ठराव वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. जोशी अ.सु.:- नगरसचिव दिनांक १७/२/२००७ रोजीचा ठराव आपणा कडेस आला आहे का?

नगरसचिव श्री.बेग एम.आय.:- सदरचा ठराव संबंधीत विभागाकडेस,शहर अभियंता यांचेकडेस पाठविला आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- स्थायी समितीचे ठरावा प्रमाणे जाहीर निविदा मागविल्या आहेत का ?

मा.श्री. जोशी अ.सु. :- या प्रकरणी जाहीर निविदा मागविणे बाबतचे प्रकरण मुख्य लेखा परिक्षक आपणा कडेस सही करिता आले आहे का ?

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- आम्ही प्रस्तावावर अंतर्गत लेखा परिक्षक यांच्याच सहया घेतो. मुख्य लेखा परिक्षकाच्या सहया घेत नाहीत.

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम अ.ए. :- फकिरवाडा कार्यालय व अकौटब्रॅन्चचे लेखा परिक्षण मी आदेशानुसार सध्या करत आहे.

मा. श्री. त्रिपाठी सु.चं. :- असे अधिकार प्रदान करणे बाबत आदेश दिले जातात ते स्थायी समितीला कळविले जातात का? स्थायी समितीचे ठरावाची पायमल्ली झाल्यास कायदेशीर मत मागवून संबंधीतावर कार्यवाही करावी.

मा. उपायुक्त श्री. लहाने साहेब :- प्री अकौट प्रस्तावाचे लेखा परिक्षण अंतर्गत लेखा परिक्षका मार्फत व म.न.पा.चे सर्व निधीबाबतचे लेखा परिक्षण मुख्य लेखा परिक्षक करतात. फकिरवाडा अपहार प्रकरणी लेखा परिक्षणाचे काम त्यांचे कडे दिलेले आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- श्री. कदम साहेब, आपण मा.स्थायी समितीचे ठरावांची अंमलबजावणी झाली की नाही हे पहाता का ? प्रकरणांवर त्यांचा अभिप्राय न घेता अंतर्गत लेखा परिक्षकाच्या सहया का घेता ? मुख्य लेखा परिक्षक स्थायी समितीचे आदेशान्वये काम करतात. त्यांनी स्टाफ वाढवून मिळणे बाबत मा. स्थायी समिती कडेस रिपोर्ट केलेला होता.

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम अ.ए.:- मला मिळालेला स्टाफ अपुरा आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाईप खरेदी कामीची कार्यवाही आपण केली आहे ती कुनाच्या आदेशान्वये केलेली आहे

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- मा. जनरल बोर्डाचे ठरावा प्रमाणे मागणी केली आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मा. स्थायी समितीचा ठराव आपण पाहिला नाही मा. स्थायी समितीचे मंजूरी शिवाय ऑर्डर द्यावयास नको होती. ऑर्डर दिली कशी ? जे जबाबदार असतील त्यांचे वर कार्यवाही करावी ठरावाची पायमल्ली झाली नाही का ?

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सर्वानुमते निर्णय घेते, प्रशासन मात्र स्थायी समितीचे ठरावावर कलम ४५१ नुसार कार्यवाही करणार अशा बाबत पेपरला बातम्या येतात मा. स्थायी समितीचे ठरावानुसार कार्यवाही होत नाही ही स्थायी समितीचे निर्णयाची पायमल्लीच आहे.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- मुंकुदनगर येथील रस्त्यांचे पॅच वर्कचे काम मा. स्थायी समितीने मंजूर केलेले आहे ते झाले नाही मा. स्थायी समितीचे ठरावाला काही महत्व आहे का नाही ?

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- तेथे खडीकरण करणे आवश्यक होते त्या रस्त्याचे छोटया छोटया भागांचे एस्टीमेट तयार केलेले असून ते मंजूरीसाठी सादर केलेले आहेत.

मा. सभापती साहेब :- मा.स्थायी समितीचे ठराव मंजूर असूनही कामे होत नाहीत. इले. पोलचे दोन लाखाचे काम अद्यापी झालेले नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. :- कार्यवाही होत नाही अवमान्यता होते. श्री मगर साहेब आपण पाईप खरेदी साठी मा.स्थायी समितीची मंजूरी का घेतली नाही.

मा.सभापती साहेब :- श्री. मगर साहेब आपण पुल बांधण्यास सक्षम असल्याचे सभेत सांगितले मात्र पेपरला वेगळेच छापून आले मग तो प्रस्ताव आमचे पुढे आलाच का ?

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- कामे होत नसल्यामुळे बारावे वित्त आयोग निधी परत जाण्याची शक्यता आहे. पुलासाठी समिती नेमली या मध्ये मा.स्थायी समितीची काय चुक आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मा.जनरल बोर्डाचे ठरावामध्ये किती पाईप घेणे या बाबत उल्लेख नाही मग आपण खरेदी ऑर्डर दिलीच कशी.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी .:- सदरचे प्रकरण मागवून घेतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- मा.स्थायी समितीचे ठरावाची अंमलबजावणी करणे प्रशासनाचे अधिकार नाहीत.का ? मात्र मा.स्थायी समितीचे निर्णयावर पेपर मध्ये टिका होते.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पेपरला बातम्या कोण पुरवितो ?.

मा.श्री.शेख मुदस्सर अ.इ.:-मुंकुदनगरचे रस्त्यांचे पॅच वर्कचे काम त्याच वेळी केले असते तर आता तेथे रस्त्यांचे काम करण्याची आवश्यकता नव्हती याबाबत जबाबदारी फिक्स करून कार्यवाही करावी.

मा.श्री.जोशी अ.सु. :- स्थायी समितीच्या ठरावाचे उलंघन केले आहे त्यांचे वर कार्यवाही करावी मुंकुंदनगर पॅच वर्कचे काम केले नाही त्यांचे वर ही कार्यवाही करावी. पाईप खरेदी बाबत मा.स्थायी समितीने ठराव केलेला होता तो व मा.जनरल बोर्डा चा ठराव वाचून दाखवावा.

शाखा अभियंता श्री. मेहत्रे आर. जी. यांनी मा.जनरल बोर्डाचे अंदाजपत्रकीय सभे मध्ये पारित झालेला पाईप खरेदी विषयी ठराव वाचून दाखविला.

मा. श्री. त्रिपाठी सु.चं. :- हा प्रस्ताव अजेंडयावर होता का?

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी :- नाही.

मा.श्री. घुले अ.ह. :- मा.स्थायी समितीचे ठरावाचे काय केले.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- मा.जनरल बोर्डाचे अजेंडयावर विषय नसतांना ठराव होतो. म.न.पा.चे विधीज्ञाना बोलावून त्यांचे मत घ्यावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :-शहर अभियंता म्हणून आपण प्रस्तावावर सही केलेली आहे.मा.स्थायी समितीचा ठराव रद्द केले बाबत मा.ज.बोर्डाचे ठरावा मध्ये उल्लेख नाही किती रकमेचे पाईप खरेदी करावे याचा हि उल्लेख त्यात नाही. पाईप खरेदीची मागणी करून आपण मा.स्थायी समितीचे ठरावाची पायमल्ली केली नाही का ते सांगावे या प्रकरणी म.न.पा.विधीज्ञाचे मत घ्यावे.

मा.उपायुक्त श्री. लहाने साहेब :- पाईप लाईन करणेच्या कामांच्या निविदा मागविल्या असता त्या ३० ते ४० टक्के जादा दराच्या प्राप्त झाल्याने सदर कामांच्या अडचणी निवारणार्थ जीवन प्राधिकरणाचा दर करार असलेल्या ठेकेदार संस्था कडून त्यांचे मंजूर दराने पाईप खरेदीस मा.आयुक्त साहेबांना मा.जनरल बोर्डाने प्राधिकृत केलेले आहे.

मा.श्री.जोशी.अ.सु.:- किती पाईप खरेदी करावयाचे त्याचा प्रस्ताव तयार करून मा.स्थायी समितीची मंजूरी का घेतली नाही.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- अजेंडया वर प्रस्ताव नसतांना ठराव केलेला आहे.

मा.उपायुक्त श्री.लहाने साहेब:- मा.जनरल बोर्डाचे ठरावामध्ये किती रकमेचे पाईप खरेदी करावे याचा उहापोह झालेला नाही.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मा.स्थायी समितीच्या ठरावाचे उल्लंघन झाले नाही का?

मा.उपायुक्त श्री. लहाने साहेब :- मा.जनरल बोर्डाचे ठरावाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ.:- मा.स्थायी समितीचे ठरावानुसार मुंकुदनगर येथील पॅचिगचे काम केले नाही नागरिक उपोशनाला बसल्यानंतर रस्त्यांचे एस्टीमेट केलेले आहे. पॅचिगचे काम वेळीच केले असते तर सदर रस्त्याचे काम आता करावे लागले नसते.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाईप खरेदीची ऑर्डर इंजिनिअर यांनीच दिली असेल. या प्रकरणी मा.स्थायी समितीचे ठरावाची पायमल्ली झाली की नाही हे मुख्य लेखा परिक्षक, नगरसचिव यांनी सांगावे.

शाखा अभियंता श्री.मेहत्रे आर.जी. :- स्टोअर विभागामार्फत पाईप खरेदी ऑर्डर दिलेली आहे.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ.:- पॅचिंगची किती कामे झालेली आहेत व किती होणे आहेत याची माहिती द्यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- मा.स्थायी समितीची मंजूरी असूनही आमचे वॉर्डातील कामे होत नाहीत.

मा.सभापती साहेब :- आपले सदस्यांचे कामाबाबत आपण मा.आयुक्त साहेबांशी मिटींग घेउन चर्चा करू म.न.पा. विधीज्ञ यांना सभेत बोलवावे.

त्या प्रमाणे म.न.पा. विधिज्ञ सौ.स्वाती नगरकर हया सभे मध्ये उपस्थीत झाल्या.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पाईप खरेदी विषयी म.न.पा.चे आर्थीक हित पाहून जाहीर निविदा मागविणेचा मा.स्थायी समितीने ठराव केला. मा.जनरल बोर्डाने मा.स्थायी समितीचे ठरावाचा विचार न करता निर्णय घेतला आहे या मध्ये चुक कुनाची.

म.न.पा. विधीज्ञ सौ. स्वाती नगरकर :- मा.स्थायी समितीचा ठराव कधी झाला या प्रकरणाची कागदपत्रे द्यावीत ते पाहून मी मत देते.

मा.श्री. जोशी अ.सु. :- अगोदर मा.स्थायी समितीचा ठराव झाला त्या मध्ये पाईप खरेदीस मा.स्थायी समितीची मंजूरी घेण्यांत यावी असे ठरले होते मा.जनरल बोर्डा मध्ये चर्चा होउन पाईप खरेदी विषयी ठराव केला प्रशासनाने मा.स्थायी समितीचे ठरावाचा विचार केला नाही वर्क ऑर्डर दिली गेली या मध्ये मा.स्थायी समितीचे ठरावाचे उल्लंघन झाले किंवा कसे या बाबत आपला कायदे विषयक अभिप्राय द्यावा.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- प्रशासनाने पाणी पुरवठया साठी उशिराने निविदा मागविल्या त्या पांच महिन्या नंतर मा.स्थायी समिती पुढे निर्णया साठी आल्या त्यात कमी दर प्राप्त झाले. पाच महिन्यात जुन्या दराने पेमेंट केले गेले.या मध्ये म.न.पा.चे आर्थिक नुकसान झालेले आहे त्यास जबाबदार कोण ?

मा.श्री.शेख मुदस्सरअ.इ.:- राज्य शासनाच्या निधीतून मुदतीत कामे झाली नाही तर निधी परत जातो मात्र ठेकेदाराने काम केले नाही. प्रशासनाने वेळेत योग्य ती कार्यवाही केली नाही तर कामे पूर्ण होत नाहीत यास जबाबदार कोण ? कार्यवाही कुनावर करावी.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ॲडव्होकेट मॅडम आपणा कडेस आम्ही लेखी देतो त्यावर आपला अभिप्राय द्यावा. मा.शासनाकडेस मा.स्थायी समितीचे ठराव कलम ४५१ खाली विखंडीत करणे साठी पाठविण्यांत येतील अशा बाबत नवा मराठा वर्तमान पत्रात बातमी होती मा.स्थायी समितीने दिनांक २८-२-२००७ रोजी पुलाचा ठराव मंजूर केला होता त्याचे काय झाले.

शाखा अभियंता श्री. मेहत्रे :-मा.स्थायी समितीने मंजूर केलेल्या ठरावाप्रमाणे सार्व.बांधकाम विभागा कडेस एस्टीमेट देणे बाबत पत्र दिलेले आहे. ठरावाची अंमलबजावणी सुरू केलेली आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पावसाळया पूर्वी पुलांची कामे पुर्ण होणे साठी प्रशासनाने कार्यवाही करावी लागल्यास त्या कामी खाजगी इंजिनिअर सुपरव्हीजन साठी नेमण्यात यावे.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ.:-मुंकुदनगरचे तीन रस्ते पॅचिग साठी होते मा.स्थायी समितीची मंजूरी असूनही कामे झाली नाहीत.मा.स्थायी समितीवर मात्र नाही नाही ते आरोप होतात हे काय आहे.

शाखा अभियंता श्री. सातपुते आर.जी. :- ग्राउन्टींग करणे आवश्यक असल्याने पॅचिगचे काम करू शकत नव्हतो. जागा पहाणी नुसार मिळालेल्या आदेशानुसार ती कामे हाती घेतली आहेत.

मा.उपायुक्त श्री.लहाने साहेब :- सदर कामे लवकरात लवकर करून घ्यावीत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- नागापुर ते बोल्हेगांव या रस्त्याचे पॅचिगचे काम अद्यापी झालेले नाही.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १७-२-२००७ दिनांक २८-२-२००७ व दिनांक ५-३-२००७ रोजीचे सभाचे कार्यवृत्त कायम करणेचा विषय पुढील सभेत निर्णयासाठी घ्यावा.

**ठराव :-**मा.स्थायी समिती सभा दिनांक १७-२-२००७ दिनांक २८-२-२००७ व दिनांक ५-३-२००७ रोजी च्या सभाचे कार्यवृत्त कायम करणेचा विषय पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमादेक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रं.-२२**
**सन २००६-२००७.**

<u>विषय क्रमांक :- २ दिनांक.२०-३-२००७</u>

ठराव क्रमांक :- २ दिनांक.२०-३-२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव येथील अंबिकानगर भागामधील रस्त्यांचे डांबरी करण करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १४,१५,८७२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, केडगांव येथील अंबिकानगर भागामध्ये पूर्वी खडीकरण झालेले असून तेथे डांबरी करण करणे बाबत तेथील नागरीकांनी मागणी केली आहे.

अंबिकानगर भागामध्ये मा.महापौर व मा.नगरसेवक श्री. भानुदास ए.कोतकर व शहर अभियंता यांचे समवेत समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी पूर्वीच्या खडीकरण झालेल्या रस्त्यांवर ४० एम एम खडीचा थर देवून त्यावर बी.बी. एम. व ४० एम .एम अॅसफाल्ट क्रॉकीटीकरण करणे गरजेचे आहे. सदर ररत्यांचे डांबरीकरण करणेचे काम म.न.पा फंडातून करणे बाबत मा.महापौर व मा.नगरसेवक श्री. भानुदास ए.कोतकर यांनी सुचित केले आहे. या नुसार सविस्तर अंदाजपत्रक रक्कम रू.१४,१५,८७२/- (अक्षरी रक्कम रू.चौदा लाख पंधरा हजार आठशे बहात्तर मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरच्या कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता मिळावी यास्तव ऑफीस रिपोर्ट मा.स्थायी समिती कडे पाठविणेस आदेशार्थ सादर

| | |
|---|---|
| लेखा शिर्ष - | नवीन रस्ते |
| तरतुद - | १६९.९० लाख |
| खर्च - | ८२,२५,७८४/- |
| शिल्लक - | ८७,६४,२१६/- |

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- शाखा अभियंता यांचे अहवालाप्रमाणे सदर ठिकाणी सध्या खडीचे रस्ते अस्तित्वात आहेत. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडलेले दिसून आले आहे सदर रस्त्यांचे डांबरी करण करणे योग्य आहे. रक्कम रू.१४,१५,८७२/- च्या खर्चास व सदर काम म.न.पा. फंडातील नवीन रस्ते या लेखाशिर्षकांतर्गत करावे लागेल. कामाची निकड असल्याने मंजूरी देणे योग्य. दि.०३/०३/२००७

अंतर्गत लेखा परिक्षक श्री. गोरे पी. आर :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे रक्कम रूपये १४,१५,८७२/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेस हरकत नाही. दि.०३/०३/२००७.

मा. उपायुक्त साहेब (सा) :- अहवालानुसार आदेशार्थ सादर. दि.०५/०३/२००७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.०५/०३/२००७.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव येथील अंबिकानगर भागामधील रस्त्यांचे डांबरी करण करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १४,१५,८७२/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु.:- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा. परंतु मा.स्थायी समिती व मा.जनरल बोर्डा मध्ये मंजूरी असलेल्या रस्त्यांची कामे दोन दोन वर्षे झाली तरी झालेली नाहीत. आदर्श नगर येथील रस्त्यांचे बरोबर मंजूरी असलेल्या इतर रस्त्यांचे टेंडर काढले आहे. आदर्श नगर मधील रस्त्याचे काम कधी मार्गी लागणार.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- ऑफीस रिपोर्टा मध्ये दर्शविलेले काम सन ०६-०७ मध्ये कि सन २००७-२००८ सालात होणार

मा.उपायुक्त श्री. लहाने साहेब :- सदर कामा करिता या लेखा शिर्षा मध्ये रक्कम शिल्लक आहे का?

शाखा अभियंता श्री. मेहत्रे आर.जी. :- होय रक्कम शिल्लक आहे.

मा.उपायुक्त श्री. लहाने साहेब :- सदर रस्त्याचे काम शिल्लक निधीतून होणार आहे .मा.श्री.जोशी साहेबांच्या सुचने नुसार आदर्शनगर रस्त्यांचे काम सुरू करावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- शांतीनगर, शक्तीनगर, यमुनानगर, इंदिरानगर, कानडे मळा भागातील लाईटचे कामास शहर अभियंता याची मंजूरी आहे परंतु काम झाले नाही त्या भागात चोरांच्या दहशती मुळे नागरिकांना सांयकाळ पासूनच रस्त्यांवर फिरणे मुस्कील झाले आहे हे काम लवकरात लवकर व्हावे.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ.:- मुंकुदनगरचे काम नगरसेवक निधीतून व्हावे अशा बाबत प्रशासनाने शेरा मारला आहे. नगरसेवक निधीतील कामे कुणी ठरवायची त्यांनीच का?

मा.श्री. जोशी अ.सु. :- आदर्श नगर रस्त्यांचे डांबरी करणाचे काम त्वरीत व्हावे.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- कुनाचे ही काम व्हावे न व्हावे असे आमचे मत नसते प्रशासकीय अडचणी, निधी या मुळे कामे करणे अडचणीचे होते. आम्ही जाणून बुजून कुनाचीही कामे पेडींग ठेवीत नाहीत सर्वाच्याकामांच्या अर्जन्सी मुळे आम्हाला टेन्शन येते.

मा.श्री. सय्यद सादिक आरीफ :- तीन महिने झाले मी यादी देउन परंतु अद्यापी काम झालेले नाही ते लवकर करावे.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त साहेबा समवेत आपण मिटींग घेउ तेव्हा सर्वानी आपली मते मांडावीत शहरअभियंता आपण ही आपल्या अडचणी त्या वेळी मांडाव्यात ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपपालिका हद्दीतील केडगांव येथील अंबिकानगर भागामधील रस्त्याचे डांबरी करण करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १४,१५,८७२/- (रूपये चौदा लाख पंधरा हजार आठशे बहात्तर फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक :- मा.श्रीमती. कांबळे मं. रा.

अनुमोदक :- मा.श्रीमती. भागानगरे म.प्र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदानगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिति सभा क्रमांक :-२२**

**सन २००६-२००७.**

विषय क्रमांक :- ३ दिनांक २०-३-२००७

ठराव क्रमांक :- ३ दिनांक २०-३-२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली साठी दिनांक १/४/२००७ ते दिनांक ३१/३/२००८ अखेर एक वर्षाचे कालावधी करिता जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-सादर,** अहमदनगर महानगरपालिकेचे क्षेत्रात जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमणे बाबत मागविण्यांत आलेल्या निविदा संदर्भात वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या जाहीर निवेदनानुसार एकूण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे प्रसिध्द केलेल्या निवेदनातील तारखे नुसार आज दि.१५/३/२००७. रोजी सकाळी ११.३० वाजता निविदा उघडणे बाबतची प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यावेळी खालील मा.पदाधिकारी अधिकारी तसेच निविदाकार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थीत होते.

| | |
|---|---|
| १ | मा.श्री. संदिप कोतकर, महापौर, अहमदनगर महानगरपालिका. |
| २ | मा.श्री. रमेश पवार, आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका. |
| ३ | मा.श्री. सुभाष लोंढे, सभापती,स्थायी समिती, अहमदनगर महानगरपालिका. |
| ४ | मा.श्री. सुधाकर देशमुख, उपायुक्त, (सा) अहमदनगर महानगरपालिका. |
| ५ | मा.श्री. सुनिल लहाने, उपायुक्त, (कर) अहमदनगर महानगरपालिका. |
| ६ | श्री. अ.ए.कदम, मुख्य लेखा परिक्षक, अहमदनगर महानगरपालिका. |
| ७ | श्री. पी. आर. गोरे, अंतर्गत लेखा परिक्षक, अहमदनगर महानगरपालिका. |
| ८ | श्री.एस.एस. परशरामी, लेखापाल, अहमदनगर महानगरपालिका. |
| ९ | श्रीमती. निलीमा बंडेलू, प्रसिध्दी अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका. |
| १० | श्री. मच्छिंद्र डवरे, प्रभारी जकात अधिक्षक, अहमदनगर महानगरपालिका. |
| ११ | मा.श्री. किशोर डागवाले, सभागृह नेता, अहमदनगर महानगरपालिका. |
| १२ | मा.श्री. कैलास गिरवले, नगरसेवक, अहमदनगर महानगरपालिका. |
| १३ | मा.श्री. संजय चोपडा, नगरसेवक, अहमदनगर महानगरपालिका. |
| १४ | मा.श्री. अनंत जोशी, नगरसेवक, अहमदनगर महानगरपालिका |
| १५ | मा.श्री. दिपक सुळ, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका |
| १६ | मा.श्री. कृष्णा जाधव, नगरसेवक, अहमदनगर महानगरपालिका |
| १७ | मे.सहकार एजन्सी प्रा.ली. |
| १८ | मे.आयडीएल रोड बिल्डर्स, प्रा.ली, अंधेरी, मुंबई. |
| १९ | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. ली. उल्हासनगर |
| २० | कोहिनूर इन्फ्रास्ट्रक्चर, उल्हासनगर |

दिनांक . १४/०३/२००७ रोजी दुपारी ४ वाजे. पर्यत एकूण चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १ | सहकार एजन्सी प्रा.ली. मुंबई . |
| २ | मे. आयडीएल रोड, बिल्डर्स प्रा.ली. अंधेरी, मुंबई |
| ३ | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. उल्हासनगर. |
| ४ | कोहिनूर इन्फ्रास्ट्रक्चर, उल्हासनगर |

वरील निविदा उघडणे बाबतची प्रक्रीया मा.आयुक्त यांचे दालनात दि. १५-३-२००७ रोजी सकाळी ११.३० वा. सुरू करण्यांत आली

| | |
|---|---|
| १ | मे. सहकार एजन्सी प्रा.ली. मुंबई . |
| २ | मे. आयडीएल रोड, बिल्डर्स प्रा.ली. अंधेरी, मुंबई |
| ३ | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. उल्हासनगर. |

यांनी निविदेत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्या मुळे तीन ही निविदा ग्राहय धरून सर्वांचे समक्ष उघडण्यांत आलेल्या आहेत. मात्र मे. कोहिनूर इन्फ्रास्ट्रक्चर उल्हासनगर यांचा तांत्रिक लिफाफा उघडला असता त्या मधे निविदा मधील अटी शर्ती नुसार आवश्यक ते कागद पत्रांची पूर्तता केलेली नसल्यामुळे सदर निविदाकाराचा देकार रकमेचा लिफाफा उघडणेत आला नाही.

त्या नंतर निविदातील देकार रकमेचे लिफाफे क्रम वाईज उघडण्यात आले त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाकाराचे नांव | निविदातील देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | मे.सहकार एजन्सी, प्रा.ली. मुंबई | ४७,१६,००,०००/- |
| २ | मे. आयडीएल रोड बिल्डर्स,प्रा. ली. | ४३,६२,००,०००/- |
| ३ | मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. | ४३,६७,७०,०००/- |

वरील तीनही निविदा कारांनी अहमदनगर महानगरपालिकेसाठी प्रशासकीय इमारत बांधून देण्यास तयारी दर्शविली आहे. तसेच निविदा उघडण्या बाबत झालेल्या प्रक्रियेचे कार्यवृत्त सोबत सादर केले आहे.

तसेच दि. १/४/२००७ ते ३१/३/२००८ या कालावधी साठी जकात अभिकर्ता नेमणूकी बाबत प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. तरी पुढील आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्र.जकात अधिक्षक श्री.डवरे मच्छिंद्र यांचा अहवाल असे. दि.१५/३/२००७.

मा.उपायुक्त साहेब (कर) :- प्रस्ताव निविदा छाननी समिती पुढे ठेवा. दि.१५/३/२००७

अंतर्गत लेखा परिक्षक :- छाननी समितीने शिफारस केले प्रमाणे व एकंदर कागदपत्रे तपासली असता मे.सहकार एजन्सी प्रा.ली. यांची निविदा मंजूर करणेस हरकत नाही. दि.१५/३/२००७

मा.उपायुक्त साहेब (कर):- निविदा शर्तीतील अट क्र. ६ (xiv)मधील तरतुदी नुसार अभिकर्ता नियुक्ती साठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे आवश्यक आहे. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता व निविदा उघडण्यासाठीच्या कार्यवाहीचे इतिवृत्त छाननी समिती समोर ठेवले असता छाणणी समितीने मे. सहकार एजन्सी प्रा.ली. मुंबई यांची देकार रक्कम रू.४७,१६,००,०००/- व अटी शर्ती नुसार प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी संम्मती दर्शविणारी निविदा स्विकारणेची शिफारस केली आहे ही निविदा स्विकारल्यास संबधीत एजन्सीस त्यांनी नमुद केलेल्या देकार रकमेच्या १६ % इतकी सुरक्षा अनामत बॅन्क गॅरंटीच्या स्वरूपात द्यावी लागेल या प्रमाणे प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे योग्य राहिल. दि.१५/३/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

दिनांक १/४/२००७ ते ३१/३/२००८ या कालावधी साठी जकात वसुली साठी जकात अभिकर्ता नेमणूकी बाबत प्राप्त निविदांचा तुलणात्मक तक्ता.

| अ नं | निविदाकाराचे नांव | मुळ निविदातील देकार रक्कम | निविदातील देकार रक्कम | किमान देकार रकमे पेक्षा जास्त आहे काय? | रकाना ५ मध्ये होय असल्यास किती | म.न.पा.प्रशास-कीय इमारत बांधून देण्यांस तयार आहे काय. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मे. सहकार एजन्सी प्रा.ली. मुंबई. | ४३,६१,४५,४०० | ४७,१६,००,००० | होय | ३,५४,५४,६०० | होय | |
| २ | मे.आयडीएल रोड, बिल्डर्स प्रा.लि. मुंबई. | ४३,६१,४५,४०० | ४३,६२,००,००० | होय | ५४,६०० | होय | |
| ३ | मे.कोणार्क,इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. ली. उल्हासनगर. | ४३,६१,४५,४०० | ४३,६७,७०,००० | होय | ६,२४,६०० | होय | |

वरील उघडलेल्या निविदा पाहता मे सहकार एजन्सी प्रा. ली. मुंबई यांचे निविदातील देकार रक्कम सर्वात जास्त म्हणजे रू. ४७,१६,००,०००/- एवढी असून मुळ देकार रकमेच्या रू. ३,५४,५४,६००/- ने जास्त आहे.

सही/-
उपायुक्त (कर),
अहमदनगर महानगरपालिका.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली साठी दिनांक १/४/२००७ ते दिनांक ३१/३/२००८ अखेर एक वर्षाचे कालावधी करिता जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-प्रशासनाने सादर केलेला ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा त्यामध्ये महानगरपालिकेचा आर्थीक फायदा आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदर बाबतीत सभे मध्ये चर्चा करावी.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ.:-जकात निविदा प्रसिध्दी करणात झालेली प्रिंटींग मिस्टेक जकातवाल्या कडून झाली किंवा कसे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- जकाती बाबत येणा-या तक्रारीचे निवारण करण्यासाठी जकात तक्रार निवारण कमेटी आहे. त्या तक्रारी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यांत याव्यात त्या साठी मा. स्थायी समिती सदस्यांची एक दक्षता कमेटी नेमावी तिच्या पुढे तक्रारीचे निवारण व्हावे. कार्यालयीन प्रस्ताव मंजूर करावा त्या मध्ये संस्थेचा चार कोटी रूपयांचा फायदा झालेला आहे. त्या मधून म.न.पा. चांगले प्रोजेक्ट राबवू शकेल.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- मा.स्थायी समिती सदस्यांची जकात दक्षता कमेटी नेमावी तिच्या पुढे तक्रारीचे निवारण व्हावे. ठेकेदाराने जकात नियमांचे कराराचे उलंघन केल्यास त्याचा ठेका रद्द करणेचे अधिकार दक्षता कमेटीस असावे.

मा.श्री. घुले अ.ह. व मा.श्री. बारस्कर पो.ज. :- दक्षता कमेटी नेमण्यांत यावी जकाती संबंधी नागरीकांच्या व्यापा-यांच्या जकाती बाबत तक्रारीचे दक्षता कमेटीने निराकरण करावे.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा. तसेच स्थायी समिती सदस्य मा.श्री. त्रिपाठी सु.चं., मा.श्री. घुले अ.ह., मा.श्री. जोशी अ.सु., मा.श्री. बोरूडे अ.व. आणि सभापती स्थायी समिती यांची एक दक्षता कमेटी नेमणेत यावी. जकात वसुली संदर्भात अभिकर्त्या विरूध्द लहान मोठया व्यापा-यांच्या ग्राहकांच्या येणा-या तक्रारी संबंधी म.न.पा.चे जकात तक्रार निवारण कमेटीने केलेला चौकशी अहवाल या दक्षता कमेटी पुढे सादर करण्यांत यावा. व दक्षता कमेटीने दिलेला निर्णय जकात अभिकर्त्याने मान्य करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका जकात हद्दीत आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुली साठी दिनांक १/४/२००७ ते दिनांक ३१/३/२००८ अखेर एक वर्षाचे कालावधी करिता जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता मे. सहकार एजन्सी प्रा.ली. मुंबई यांची देकार रक्कम रूपये ४७,१६,००,०००/- (रूपये सत्तेचाळीस कोटी सोळा लाख फक्त) व अटी शर्ती नुसार प्रशासकीय इमारत बांधणेसाठी संम्मती दर्शविणारी निविदा मंजूर करणेत येत आहे. तसेच संबंधीत मंजूर निविदाकार यांचे कडून देकार रकमेच्या सोळा टक्के प्रमाणे सुरक्षा अनामत, बॅन्क गॅरटीच्या स्वरूपात घेण्यात यावी ऑफीस रिपोर्ट मंजूर.

तसेच स्थायी समिती सदस्य मा.श्री. त्रिपाठी सु.चं., मा.श्री. घुले अ.ह., मा.श्री. जोशी अ.सु., मा.श्री. बोरूडे अ.व. आणि सभापती स्थायी समिती यांची एक दक्षता कमेटी नेमणेत यावी. जकात वसुली संदर्भात अभिकर्त्या विरूध्द लहान मोठया व्यापा-यांच्या ग्राहकांच्या येणा-या तक्रारी संबंधी म.न.पा.चे जकात तक्रार निवारण कमेटीने केलेला चौकशी अहवाल या दक्षता कमेटी पुढे सादर करण्यांत यावा. व दक्षता कमेटीने दिलेला निर्णय जकात अभिकर्त्याने मान्य करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी,

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.चं.

अनूमोदक :- मा.श्री. घुले अ.ह.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती ,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.